Review Of Research
Vol. 3 | Issue. 9 | June. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X                                                    Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# दलित कवितेतील आत्मशोधाचे स्वरुप

**पारसे बिरा दशरथ**

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर

***सारांश :-***

आत्मशोधाची कविता ही संकल्पना दलित कवींची कविता या अर्थाने वापरली आहे. दलित कवितेतून व्यक्त होणारी 'आत्मशोध' ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी दलित कवींच्या कवितांचा आधार घेतला आहे. दलित कवितेतून व्यक्त होणाऱ्या आत्मशोधाचे स्वरुप काय आहे याचा उलगडा करीत असताना दलित कवितेमध्ये आत्मशोध हा कशा प्रकारे प्रकट होतो, त्यामागची भूमिका अधिक सुस्पष्ट करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करण्यात आला आहे.

***प्रस्तावना :-***

म.फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेवून दलित साहित्य समृध्द झाले. या साहित्याचे समृध्द दालन म्हणून दलित कवितेचा उल्लेख करावा लागतो. दलित जीवन हे पूर्वसुरिंच्या उपेक्षित, वंचित नि अवमानित माणसांचे जीवन, परंतु हया जीवनाच्या साहित्यांची वसंत पहाट फुटली तीच मुळात अपूर्व, ही पहाट पक्ष्यांची मधुर किलबिल घेऊन उगवत नाही. तर दलित जीवनाचे दुःख, दैन्य, दारिद्रय, चीड, प्रक्षोभ तर कधी रौद्रभेसूर सूर घेऊन ही काव्याची पहाट प्रकाशू लागते, प्रखर होत जाते.

'अंधाराने सूर्य पाहिला तेंव्हा.....
नरकाच्या कोंडवाडयात, किती दिवस राहायचं आम्ही?
....अगतिक किडयासारखे आजपर्यंत
लक्तरात गुंडाळलेली आमची अब्रू गोलपिठयावर नागविणारांनो
.....तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी....
शब्द म्हणाले.....अंधाराने सूर्य पाहिला तेंव्हा....
(गोलपिठा नामदेव ढसाळ)

Review Of Research
Vol. 3 | Issue. 9 | June. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.net

मराठी कवितेच्या क्षेत्रात खळबळ निर्माण करणारी 'दलित कविता' म्हणजे समाजातील अहंकार, अन्यायाची प्रवृत्ती बाळगणाऱ्या पांढरपेशी मराठी वाङमय प्रवृत्तीला एक आव्हान आहे. माणूस हा देव, धर्म व देशापेक्षाही मोठा आहे, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था उध्दवस्त करुन स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारीत अशा नव्या समाजव्यवस्थेची निर्मिती केली पाहिजे. यासाठी अनेक दलित कवी हे शिक्षणामुळे सुधारणेची, आत्मभानाची, 'आत्मशोधा' ची झालेली जाणीव कवितेच्या व्दारे प्रकट करु लागले.

ज्या ज्या गोष्टी भारताच्या महानतेचा मानदंड म्हणून गौरविल्या जातात त्यावर प्रत्येक भारतीयाला सारखाच हक्क सांगण्याची सोय नाही. देशाचा सांस्कृतिक उत्कर्ष व सामान्यांचे भरकटत जाणारे आयुष्य याला कारण दुसरे नसून येथील उच्चवर्णीय राजकर्ते आणि कांही मोजक्या लोकांचा वर्गच होता. तेव्हापासून ते आज स्वातंत्र्याची चार शतके झाली तरी हीच स्थिती आहे. दलित कवितेत विद्रोह आला तो केवळ या प्रवृत्तीमुळे आणि अनेक दलित कवींच्या मुखातून, डफातून, गीतातून आत्मसन्मानाचा हुंकार निनादू लागला आणि आत्मसन्मानासाठी या कवींना 'आत्मशोध' हा अटळ वाटला.

ती पहा रे ती पहा मातीची अस्मिता आभाळभरझालीय
माझ्याही 'आत्म्याने' झिंदाबादची गर्जना केलीय'
('गोलपिठा'—नामदेव ढसाळ)

जशी प्रतिभेला वास्तवाची गरज असते तव्दतच कल्पनेलाही जीवनातील 'आत्मशोधा'ची गरज असते. दलित कवितेत 'आत्मजाणीव आणि डोळसभान' यांचे औचित्य प्रत्येक कवितेत कोणत्या ना कोणत्या रुपाने प्रकट झालेले असते हे मी नव्याने सांगण्याची गरज नाही.

आत्मशोध म्हणजे काय?

दलित कविता ही आत्मभानातून, आत्मपीडेतून आलेली आहे हे आज सर्वमान्य झालेले आहे. तरी देखील ती आत्मशोधातून आलेली आहे हे नाकारता येत नाही. या अर्थाने ही संकल्पना मला महत्वाची वाटते. डॉ बाबासाहेब आंबेडकरयांच्या विचार प्रणालीतून निर्माण झालेली जाणीव, दुख, दैन्य, दारिद्रय, वेदना, यातना, याचे भान आले यातूनच दलित कवी आपले कविता लेखन करु लागले.

''आत्मशोध'' म्हणजे 'स्व' अस्तित्वाचा शोध.

1)विशिष्ट परिस्थितीमध्ये जन्मलेल्या जीवाचा, जीवनाचा शोध म्हणजे 'आत्मशोध' होय.
2)''स्वतःचे केंद्रस्थान महत्वाचे मानून सामाजिक जीवनामध्ये सामाजिक घटक म्हणून घेतलेला अनुभव म्हणजे 'आत्मशोध' होय''.
3)''आत्मशोध'' म्हणजे स्वतःचा शोध''.

अशासारख्या व्याख्या 'आत्मशोध' या संकल्पनेच्या करता येतील. परंतु 'आत्मशोध' हा शब्द आत्मभान या शब्दाचा संबंधित प्रतिशब्द म्हणून वापरलेला आहे. हे कृपया वाचकांनी लक्षात घ्यावे. याचे कारण दलित कवींना 'आत्मशोधा' मुळे आत्मबळ प्राप्त झाले आहे. आपल्या निर्मितीचे मूळ शोधताना कवी जीवनातील गुंतागुंत, दुःख, दैन्य हे कवितेतून सहजगत्या प्रकट करतो, तेंव्हा ती कविता नुसती देखणी, वेधक बनूनच राहत नाही तर ती एवढीच भेदक व मर्मस्पर्शी बनते.

'इथे जगतात मढे जीवंत हाडामासांचे'
स्वतःची 'आयडेटिटी' त्यांनाही पाहिजे आहे
आता मढयांनाही जातीचं लेबल लावायची....'

समाजातील विसंगतीवर नेमके बोट ठेवणारी ही कविता अंतर्मुख बनून 'आत्मशोध' घेते. स्वतःला शोधणे हा आंबेडकरवादी कवितेचा मोठा प्रत्ययकारी गुण आहे. हा तिचा स्वभाव आहे काही कवींची उदाहरणे–

'शब्दानेच पेटवतात घरे, दारे, देश आणि माणसेसुध्दा
आणि विझवतात आगही पेटलेल्या मनांची!'
(वामन निंबाळकर)
किंवा
'कालचा पाऊस आमच्या गांवात आलाच नाही....
सदर्हू पीकआम्ही आमच्या आसवांवर काढले'.

दलित कविता कवींच्या दृष्टीने सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनासाठी चाललेल्या संघर्षाचे हत्यार आहे. शिक्षणाने 'स्व' त्वाचे भान आल्यानंतर डॉ.आंबेडकरांनी दिलेल्या विचाराच्या प्रकाशात दलित कविता 'आत्मशोध' घेऊ लागली. मग ती आपले स्वत्व प्रस्थापित करण्याची धडपड करु लागली. प्रत्येक कलावंताला स्वतःचे असे एक वर्गचरित्र असते. हे नामदेव ढसाळ यांचे म्हणणे नाकारता येत नाही. परंतु या वर्गचरित्राबरोबरच त्याला एक वैयक्तिक चरित्रही असते. माणसाला वर्ग चरित्र असले तरी त्याला ते जगता येत नाही. तो वैयक्तिक चरित्रच जगत असतो. तेच त्याच्या दृष्टीने महत्वाचे असते. वर्गचरित्र हे या वैयक्तिक चरित्राला पार्श्वभूमीसारखे असते. म्हणून स्वत्वशोधामध्ये स्वतःच्या 'आयडेंटिटचा व 'आत्मशोधात स्वतःला सर्वांगांनी जाणून घेण्याचा अर्थ अभिप्रेत आहे. स्वत्वशोधातून स्वतःचा प्रतिभाधर्म, स्वधर्म प्रतीत होतो आणि आत्मशोधातून एकूण मानवी मनाशीच भिडता येते.

जो स्वत्वशोध टाळतो त्याला कसलाच शोध घेता येत नाही. एवढेच नव्हे तर स्वत्वविहीन व्यक्ती वर्गविहीनच काय, पण कोणत्याही समाजाची निर्मिती करु शकत नाही. त्याला कसलीच निर्मिती करता येणे शक्य नाही. कारण कवी हा देखील शेवटी एक 'माणूस' असतो. त्याला आपल्या जगण्याची सार्थकता अनेक संबंधामध्ये जगताना अनुभवास येते. त्याचे जगणे म्हणजे एक एक संबध अर्थपूर्ण करणे असते. याचाच अर्थ असा की, माणूस म्हणजे एक संबंधाचा गुंता होय. दलित लेखकांनी स्वतःचे व कुटुंबियांचे जीवन मांडण्याची लाट आणली त्यासाठी 'आत्मकथन' हा शब्दप्रयोग केला गेला. हया शब्दास कधी विरोध केला गेला नाही. दलित स्व कथने साहित्यरुपे' हा आरती कुसरे–कुलकर्णी यांचा एकमेव त्याला अपवाद आहे. डॉ.यशवंत मनोहर हे आंबेडकरवादी साहित्याची भूमिका स्वीकारल्यानंतर 'आत्मकथने' हा शब्दप्रयोग टाळून 'स्व–कथने' असा शब्दप्रयोग वापरतात.

भगवान बुध्दाचे वैशिष्टय असे की, ते नकार देताना स्वीकारायचे काय हे सांगतात, डॉ. आंबेडकर यांनीही हेच सांगितले. बुध्दाने आत्म्याचे अस्तित्व नाकारले, पण मनाचे अस्तित्व स्विकारले. आत्मा आहे हे विज्ञानालाही स्पष्ट करता आलेली नाही. विज्ञानाने प्रगतीची प्रचंड झेप घेऊनही वैज्ञानिकांना आत्म्याचे अस्तित्व अद्याप गवसलेले नाही. माणसाला मन असते त्यानुसार तो वर्तन करीत असतो. हे सर्व शास्त्रज्ञही मान्य करतात. हा 'आत्मा' ही दलित कवितेत वावरतांना दिसतो. या अर्थी 'आत्मशोध' ही संकल्पना अधिक सुस्पष्ट व्हावी या एकमेव उददेशाने प्रस्तुत लेखाचा विचार व्हावा त्याची काही उदाहरणे ही देता येतील–

लाख नाकारीत असाल
नाकारा
आम्हाला त्याचे काहीच नाही
नाही उठत पेटून आता भुकेला 'आत्मा'
कारण तोही खूब समजून चुकलाय
नागडे मन तुमच्याजवळ नाहीच नाही'
('छावणी हलते आहे' अर्जुन डांगळे)

'विवश आत्मार्पणावर करणार आहे नथया अर्हतेचे मार्तब'

('उत्खनन' प्रा.केशव मिश्राम)
'हे महाकवे...हा अन्याय अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास...तर
तुझे नांव काळजावर कोरुन ठेवले असते!'
(कोंडवाडा' दया पवार)
'आत्म्या, चल फूट भडव्या!
नसती साली, ब्याद, चाय कम'
('तुझी इयत्ता कंची'—नामदेव ढसाळ)
आम्ही मिटून घेतली
आत्मशोधाची दारं'
('अंतस्थ'—प्रज्ञा लोखंडे)
माझ्या बाहुपाशात तुझा आत्मा
झेलला जातो मुकपणं'
('गांडू बगीचा'—नामदेव ढसाळ)

'आत्मशोध' हा शब्द केवळ आध्यात्मिक अर्थाने वापरलेला नाही. आत्म्याला आध्यात्मिक भाषेत चैतन्यतत्व म्हटले जाते. परंतु दलित कवितेत सामान्यपणे अंतःकरण, अस्तित्व, प्रकृती, स्वःशोध यासाठी आत्मा या संकल्पनेचा वापर केला आहे. अर्जुन डांगळे आपल्या कवितेत 'भुकेला आत्मा' आणि 'नागडे मन' या दोन्ही संकल्पना वापरतात. याचा अर्थ ते मनाच्या अस्तित्वाबरोबरच आत्म्याचे अस्तित्वही मान्य करतात. 'आत्म' या शब्दापासून तयार केला गेलेला 'आत्मशोध' वा 'आत्मा' पासून तयार झालेला आत्मार्पण' हे शब्द आत्म्याशी संबंधित आहेत. आत्मार्पण म्हणजे स्वतःला ईश्वरास वाहून घेणे. पराधीन देह जो ईश्वरास वाहिलेला आहे, तो माझाअसल्याचे मी मार्तब करणार आहे या अर्थाने आत्मार्पण शब्दप्रयोग वापरला जातो. प्रा.केशव मेश्राम यांनी 'विद्रोही कविता' या आपल्या पुस्तकामध्ये ही संकल्पना कांही प्रमाणात मांडलेली आहे. त्याचप्रमाणे 'दलित कविता' या पुस्तकामध्ये म.सु.पाटील यांनी तर 'आत्मशोध' ही संकल्पना स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'दलित कवितेतील हिंदूत्व' या पुस्तकामध्ये मोतीराम कटारे यांनी 'आत्मशोध' म्हणजे स्वतःचा शोध अशी आत्मशोधाची व्याख्या केलेली आहे. 'दलित कविताः एक दर्शन' या पुस्तकामध्ये ललित कुंभोजकर यांनीही 'आत्मशोध' या संकल्पनेचा कांही प्रमाणात ऊहापोह केलेला आहे. 'दलित वाङमय प्रेरणा प्रवृत्ती' या पुस्तकातही शंकरराव खरात यांनी 'आत्मशोध' असा शब्दप्रयोग वापरला आहे.

प्रा.गंगाधर पानतावणे म्हणतात 'आंबेडकरी विचारांनी दलितांना पंख दिले,'आत्मशोध' करायला शिकवले. त्यांनीही 'आत्मशोध' ही संकल्पना मान्य केलेली आहे. थोडक्यात कवि हा शेवटी 'माणूस'

असतो त्याला आपल्या जगण्याची सार्थकता अनेक संबंधामध्ये जगताना अनुभवास येते. कवितेतून व्यक्त होणारे जीवन हे समूहाचे आहे. पण त्याचे भान समूहाला नाही. ते एका व्यक्तीमनाला कळलेले असते. ते त्याने मनस्वीपणे अनुभवलेले आहे. त्यावर वैयक्तिक संवेदनशीलतेची अविट मुद्रा असते. समुहाच्या उरात घुसमटून जाणाऱ्या सर्व वेदना जणू येथे एका व्यक्तिमनाच्या व्दारे एकवटून उद्रेकित झाल्यासारख्या वाटत असतात. त्या वेदनांची व्यावहारिक कृतीमध्ये खर्च न झालेली भावशक्ती 'आत्मशोधा'ला जन्म देते. तेव्हा ही कविता गतइतिहासाचे विश्लेषण आणि वर्तमान इतिहासाचे भान ठेवते म्हणून जाणीवपूर्वक आत्मशोधची अभिव्यक्ती करणारी कविता म्हणण्याचे कारण असे की, आंबेडकरी प्रेरणेच्या विद्राही कवितेत नकार जसा प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. तव्दतच या मातीतील मूल्यांचा स्वीकार करणारी भाववृत्ती विद्रोहापेक्षा स्वतःचे वेगळेपण जपणारी आहे.

''साल्या! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसशील काय?''
(केशव मेश्राम)

अशासारखी कवितेची अनुभूती आत्मशोधाच्या जाणिवांचा उद्रेक नसून तो परिपाक आहे. यामध्येच आत्मशोधाच्या कवितेचे यश सामावले आहे. म्हणून दलित कविता ही आपल्या अस्तित्वाचा शोध लावूनही जीवनाचा नवा अर्थ लावते. अशा वेळी ती क्रांतीची भाषा बोलते, तेंव्हा साहजिकच या पाठीमागे 'आत्मशोध' असतो.

'इथे पापणीलाच केस नसतो
आणि बुबुळाच्या काचा झालेल्या असतात रे
येथला प्रत्येक पिवविता कुजूषच असतो.
म्हणून नुसते प्यालेच फोडून चालत नाही रे
इथे आतून पेटलेलाच 'आत्मा' नसतो'.
(नामदेव ढसाळ)

या ओळीमधून कवीने आपल्या अस्तित्वाचे यथार्थ चित्रण केले आहे. अशा या आत्मचिंतक, आत्मशोधक कवींच्या काव्याचे 'आत्मशोध' च्या अंगाने विश्लेषण करणे हा या लेखनापाठीमागचा हेतू आहे. अन्यथा कविता ही तपशिलामुळे आत्मशोधाची किंवा विद्रोहाची न ठरता त्यातील जाणीव तिला आत्मशोधाची किंवा विद्रोहाची ठरवत असते. दलित कवितेची वाडमयीन चिकित्सा तिचे योगदान मराठी साहित्यात मोठे आहे. या गोष्टींचा विचार समोर असताना देखिल प्रस्तुत लेखन केले आहे.

'दलित कवितेतील आत्मशोध' हा विषय स्वतंत्र प्रबंधाचा विषय आहे. एवढया लहान लेखातून या विषयाची सखोल मांडणी करणे शक्य नाही. परंतु हे केवळ 'आत्मशोधा' च्या जाणिवेच्या अंगाने सूतोवाच आहे. एवढाच याचा अर्थ घ्यावा.

### संदर्भ सूची :

1. 'अस्मितादर्श' दिवाळी अंक 1992, पृ.6
2. 'सुगावा' डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा विशेषांक 1993.

3. 'निळी पहाट' रा.ग.जाधव
4. 'आंबेडकरीवादी वाङमयीन जाणीवांची अक्षरसाक्ष' डॉ.योगेंद्र मेश्राम.
5. 'दलित कवितेतील हिंदुत्व'—मोतीराम कटारे

6. 'दलित कविता'—म.सु.पाटील
7. 'दलित कविता'—एक दर्शन—डॉ.ललिता कुंभोजकर
8. 'विद्रोही कविता' संपा.प्रा.केशव मेश्राम
9. 'आंबेडकरवादी मराठी साहित्य—प्रा.यशवंत मनोहर.
10. 'दलित विद्रोह'अर्जुन डांगळे
11. 'दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया'—संपा.गो.म.कुलकर्णी.



**पारसे बिरा दशरथ**

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर